# हे नारी, तू कल्याणी हो!



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्वविद्यालय

# हे नारी, तू कल्याणी हो!

**आ**ई आपल्या उदरात नऊ मास मुलाला वाढवीत असते. नंतर तो जन्मास आल्यावर अनेक खस्ता खाऊन त्याचे पालन व पोषण करते. त्याला न्हाऊ-माखू घालून सजविते आणि मोठ्या लाडाने व प्रेमाने त्याला चालावयास व बोलावयास शिकविते. थोडक्यात म्हणजे तळहाताच्या फोडाप्रमाणे जपून त्याला लहानाचा मोठा करते. अशा आईवर प्रेम न करणारा, तिचे म्हणणे न मानणारा असा कृतघ्न मुलगा जगात कोणी विरळाच असू शकेल.

आई स्वतः मुलाला बोलावयास जरूर शिकवू दे पण 'काय बोलावे व काय बोलू नये' हे जर ती शिकवीत नसेल म्हणजे 'गोड बोलावे, कटू बोलू नये, खरे बोलावे खोटे बोलू नये, स्वतःला 'आत्मा' समजून शालीनतेने बोलावे, स्वतःला देह मानून बोलू नये इत्यादी समजावून सांगत नसेल तर ती आई स्वतः आपले कर्तव्य पार पाडीत नाही असे म्हणावे लागेल. तसेच जी आई मुलाला आपल्या बोटाचा आधार देऊन त्याला चालावयास शिकविण्याचा प्रयत्न व प्रयास करीत असेल पण जीवनाच्या कोणत्या मार्गावर व कसे चालावे अर्थात माणसाचे आचरण कसे असावे हे जर शिकवीत नसेल तर तीही आपले कर्तव्य योग्यरीत्या निभावीत आहे असे म्हणता येणार नाही.

मुलाचा जन्म झाल्यानंतर जी आई त्याच्या जिभेवर मध ठेवते

किंवा मधाने 'ओम्' लिहावयास लावते पण त्याला 'ओम्'च्या अर्थस्वरुपात स्थित व्हावयास लावीत नाही किंवा त्याच्या बोलण्यात व स्वभावात मधाची गोडी भरीत नाही तीही आपले कर्तव्य पूर्णपणे बजावीत नाही असे म्हणणे भाग पडेल.

जी आई आपल्या मुलाला ऐहिक विद्या शिकण्यासाठी शाळेत पाठविते, त्याकरिता तन-मन-धन कामी लावते आणि त्याला शाळेत जाताना पाहून खुशही होते पण मुलाला सदैव आनंदी स्वभावाचा, हसतमुख व सुखी बनविणारी आध्यात्मिक विद्या शिकवीत नसेल तर ती त्याच्यावर खरे प्रेम करते आणि त्याच्याशी खरी मैत्री निभावते असे म्हणणे चूक ठरेल कारण ती आपल्या अशा वागण्याने मुलाच्या जीवनाचा पाया योग्य व सुदृढ बनवीत नाही. शारीरिक विकासाबरोबर जी आई मुलाच्या आत्मिक किंवा चारित्र्याच्या विकासाकडे लक्ष देत नसेल तर ती मुलगा, कुटुंब, समाज व जगाबद्दलच्या आपल्या आवश्यक कार्याकडे दुर्लक्ष करते असेच म्हणावे लागेल. कारण असा मुलगा पुढे मोठा झाल्यावर सुखमय जीवन जगण्याची कला न जाणल्याने स्वतः तर अशांती अनुभव करतोच पण त्याचबरोबर जगातही अशांती पसरविण्यास निमित्त बनतो. म्हणून हे नारी, हे माते, तुला लक्षात ठेवावयास हवे की तूच मानवाचा पहिला गुरू आहेस, तूच जगज्जननी आहेस. तेव्हा आता तू जगज्जननी हो, कल्याणी हो मगच या जगाचे कल्याण होईल.

कोण म्हणतो की, स्त्री अबला आहे ? जिने मोठमोठ्या चक्रवर्तींना

आणि छत्रपतींना अंगाखांद्यावर खेळविले आहे, मांडीवर बसवून भरविले आहे आणि त्यांच्यावर चांगले संस्कार केले आहेत, ज्या मातेने कोटयवधी लोकांच्या मनांवर राज्य करणाऱ्या ध्रुव, शंकराचार्य, येशू ख्रिस्त, महात्मा गांधी इत्यादींसारख्या थोर पुरुषांना धर्माचा पहिला धडा शिकविला, ज्या मातेने श्रीराम व श्रीकृष्ण यांसारख्या देवतांना जन्म दिला त्या मातेला 'अबला' कोण म्हणू शकेल ? 'शतकानुशतके' ''अबला, अबला'' असे संबोधूनच पुरुषांनी स्त्रीला खरोखरच अबला बनवून टाकले आहे, अन्यथा स्त्री ही तर आपल्या स्वरुपात 'शिवशक्ती' आणि देवी आहे. आध्यात्मिक दृष्टया प्रत्येक आत्मा हा 'पुरुष' तर 'शरीर प्रकृती' होय. तेव्हा आपले लक्ष्य नीट जाणून घेऊन त्याच्या प्राप्तीसाठी पुरुषार्थ करणारी स्त्री हीसुद्धा 'पुरुष'च होय. म्हणून हे नारी, हे माते तू आपले शुद्ध स्वरूप जाणून घेऊन आणि स्वत:ला सबला मानून आपले कर्तव्यरुपी शस्त्र हाती घे व ललकारी दे की, तू अबला नव्हे कल्याणी आहेस. आता तू जगदंबे प्रमाणे कल्याणी हो.

पुरुषांनी तुला ''अबला'' म्हणावे हा तर घोर अनर्थच होय. तुला 'नरकाचे द्वार' म्हणणे हा तर मोठाच अन्याय आहे. तुला ते 'भोग्य वस्तू' समजतात हे तर महापाप होय. खरोखर मानवतेला हे धिक्कारणे आहे, मानवतेला लागलेला कलंक आहे. हे नारी, तू आता अनसुया हो. ब्रह्मा, विष्णू व शंकर जिला माता म्हणतात तशी तू तपस्विनी हो. योगाग्नीची तू ज्वाळा हो. 'नरकाचे द्वार' म्हणणाऱ्या अपकाऱ्यांवरही ज्ञानाद्वारे

उपकार करून तू जगाची उद्धारकर्ती हो. कमलपुष्पाप्रमाणे पावन बनून तू विश्व-कल्याणी हो.

हे नारी, आता तू निरर्थक व जाचक बंधने तोडून टाक, संकुचितपणा सोड, विकारांकडे पाठ फिरव, स्वतःला जगन्माता समज. लाखो-करोडो लोकांचा आक्रोश तुझ्या कानी नाही का पडत ? "माते, हे ज्योतिस्वरूप माते", अशी करूण स्वरा घातलेली साद तुला नाही का ऐकू येत ? मुले रात्रभर जागून तुला हाका मारीत आहेत आणि तुझा जयजयकार करीत आहेत अशा वेळी तुला झोप तरी कशी येऊ शकेल ? आता ऊठ, जागी हो, प्रथम आपली ज्ञानज्योत प्रज्वलित कर, स्वतः जगन्मातेचे रूप धारण करून मनोविकारांवर विजय मिळव आणि भक्तांना आपल्या दैवी रुपाचा साक्षात्कार घडव. आता तू वरदानी हो, हे माते, आता तू कल्याणी हो.

तुला असे तर नाही ना वाटत की, 'ज्योतिस्वरूप माता' कोणी दुसरीच आहे ? कमलपुष्प-निवासिनी, वीणा वादिनी, असुरसंहारिणी अशी देवीरुपा स्त्री तर फार पूर्वी होऊन गेली आहे आणि तू ती नव्हेस ? हीच तर खरी तुला आपल्या मातृस्वरुपाची झालेली विस्मृती होय, ज्यामुळे आज जगाची ही दुर्दशा झालेली आहे. तेव्हा तू आता ऊठ, आपले खरे स्वरूप ओळख, ज्ञानवीणा हाती घेऊन जगाला ईश्वरी ज्ञानाचे गोड गीत ऐकव आणि आनंदमय कर.

बरे, तू जर ती देवी नसलीच तरी तिचे संतान तर आहेस ना ? हंसाचे पिल्लू हंस, कोकिळेचे पिल्लू कोकीळच असते नाही का ? तेव्हा


वास्तविक तू देवी व देवतांची वंशज आहेस, म्हणूनच तर भारतीय स्त्रियांच्या नावाआधी 'देवी' शब्द लावण्यात येतो आणि वक्तेही व्यासपीठावरून स्त्रियांना देवी म्हणून संबोधितात. याच कारणामुळे भारतीय स्त्रियांची नावे फार पूर्वीपासून शांती, संतोष, सरला, प्रेमा इत्यादी एखाद्या दिव्यगुणानुसार ठेवण्यात येतात. तेव्हा वास्तविक तुझे आदी स्वरूप देवीच आहे, तू आपली वास्तविकता आणि वंश जाणून घे. ऊठ, ज्ञानाची ज्योत घेऊन प्रत्येक व्यक्तीची आत्मिक ज्योत प्रज्वलित कर. सांप्रत या सृष्टीरुपी विशाल घरात काळाकूट्ट अंधकार पसरलेला आहे. आता तू ज्ञानज्योतिद्वारे अंधकाराचा नाश कर. काम, क्रोध, लोभ, मोह, ईर्ष्या द्वेष, मत्सर, घृणा, हिंसा इत्यादी आसुरी दुर्गुण थैमान घालीत आहेत आणि त्यांनी पीडित होऊन सारे जग त्राही त्राही करीत आहे. आता तू दुर्गा होऊन या आसुरीपणाचा नाश कर.असे घोर अध:पतन आणि अकल्याण तू बघू शकतेस का? ऊठ, आता तू पवित्रता धारण करून धवला सरस्वती हो, कमळासारख्या आगळ्या जीवनरुपी आसनावर स्थित होऊन आणि शिवस्मृतीत निमग्न राहून तपस्विनी हो आणि ह्या उभयतांचे वर इतरांना देणारी वरदानी हो. आता तू कल्याणी हो.

सून जेव्हा प्रथम घरात येते तेव्हा घरात 'लक्ष्मी' आली असे नाही का लोक म्हणत? भारताच्या पूर्वापार प्रथेनुसार स्त्रीला 'गृहलक्ष्मी' नाही का म्हटले जात? तेव्हा तुझेच तर आदी स्वरूप लक्ष्मी आहे. जी आपले लक्ष्य गाठण्यात दृढनिश्चयी असते व दिव्यगुण धारण करते तीच

तर लक्ष्मी देवी हो, म्हणूनच तर लोक म्हणतात की, ''हे नरा, तू असे कर्म कर ज्यायोगे नारायण होशील आणि हे नारी तू असे कर्म कर ज्यायोगे लक्ष्मी होशील''. तेव्हा बराच काळ लोटला आहे, आता तरी तू आपले लक्ष्य गाठण्यास दृढ रहा आणि असे कर्म कर की ज्यायोगे तू साक्षात लक्ष्मी बनशील. जीवन कमलपुष्पासमान असल्यानेच लक्ष्मीला 'कमला' असेही म्हणतात. म्हणून तू आता आपले जीवन पुन्हा कमलपुष्पासमान पवित्र कर. असे केल्यानेच हा भारत पुन्हा स्वर्ग बनेल आणि येथे श्री लक्ष्मी व श्री नारायण यांचे राज्य येईल. तेव्हा आता स्वत:ला भावी लक्ष्मी समजून आणि गतकालीन देवी मानून मन वर मुद्रेत ठेवीत सर्वांना लक्ष्य गाठण्यासाठी दृढनिश्चयी करण्याची सेवा कर. याच रीतीने हे कलियुग जाईल आणि सत्ययुग येईल. हे उद्दीष्ट सिद्धीस नेण्यासाठी तू योगिनी हो, ज्ञानी हो.

काली व दुर्गा या देवींनी महिषासूर, रक्तबीज, त्रिपुरासूर वगैरे असुरांचा संहार केला. त्याचे आजही गायन करण्यात येते. पण ते असूर कोणी भयावह शरीराकृतीचे व कोण्या विशिष्ट जातीचे लोक थोडेच होते. 'महिष' (रेडा) तर अविवेक किंवा मंदबुद्धीचे प्रतीक आहे. त्याचा काळेपणा हा मनोविकरांद्वारे एकत्रित झालेल्या काळीमाचे द्योतक आहे आणि त्याच्या हातांतील शस्त्रे ही आत्म्यास दु:ख देणारे सामर्थ्य दर्शवितात. 'रक्तबीज' हे नाव नसानसातून वाहणाऱ्या रक्ताच्या प्रत्येक थेंबात घुसलेल्या आसुरीपणाचे बोधक आहे अर्थात क्रूर दुर्गुणांचा परिचायक आहे. हा आसुरीपणा आज वर, खाली सर्वत्र तिन्ही पुरांत

पसरलेला आहे. तेव्हा अशा आसुरीपणाचा नाश करणे म्हणजेच जणू काय महिषासूर, रक्तबीज, त्रिपुरासूर वगैरे असुरांचा संहार करणे होय. अशा आसुरीपणाला कालाचा ग्रास बनविणारी अर्थात त्यांना मारून नष्ट करणारी तीच तर 'काली' होय. अशी माता जी मनोविकार व दुर्गुणांना मारून त्यांचा नायनाट करते तीच तर कालीमाता किंवा दुर्गा होय. 'काली माता', दुर्गा ह्या पूर्वकाली होऊन गेलेल्या कोण्या एका मातेचे संज्ञावाचक नाव नसून कर्तव्यवाचक नाव आहे. अशी प्रत्येक माता जी आपल्या तसेच लोकांच्या मनातून अविवेक आणि आसुरीपणा निपटून टाकते तीच कालीमाता किंवा दुर्गा होय. जी माता ब्रह्मा, विष्णू व शंकर ह्या त्रिदेवांचे गुण धारण करून तसेच परमपिता शिव परमात्म्याकडून योगाद्वारे आध्यात्मिक शक्ती घेऊन जगातील लोकांना



आसुरीपणाच्या तडाख्यातून मुक्त करते तीच असूरसंहारिणी व दु:ख-निवारिणी 'शिवशक्ती' होय. तेव्हा हे नारी, आता तू अशी तरण-तारिणी, दु:ख-निवारिणी, असूर-संहारिणी आणि कल्याणी हो.

'शिव' कोण आहे ? जो सर्वांचे कल्याण करतो तोच 'शिव' होय. सर्वांचे कल्याण कोण करू शकतो ? जो स्वत: सदा कल्याण स्वरूप आहे, सदा सर्व बंधनातून मुक्त आहे, ज्ञानाचा सागर, शांतीचा सागर, आनंदाचा सागर आणि परम-पवित्र आहे तोच 'शिव' होय. हे सर्व सद्‌गुण तर एक परमपिता परमात्म्याचेच आहेत. तेव्हा परमपिता परमात्म्याचेच नाव 'शिव' किंवा 'सदाशिव' आहे पण परमात्मा तर जन्म-मरणातीत, देहमुक्त, शारीरिक आकृतीरहित ज्योतिस्वरूप आहे. म्हणून 'शिव' हे नाव कोण्या शरीरधारी देवतेचे नाही. 'शिव' हा तर शंकराहून भिन्न, देवांचाही देव आहे. तो ज्योतिर्बिंदू असून त्याचे बृहद स्मृतिचिन्ह शिवलिंग अर्थात स्त्रीलिंग आणि पुल्लिंगाहून भिन्न 'ज्योतिर्लिङ्गम' नामक प्रतिमा मंदिरात स्थापन केलेली असते. तो शिव परमात्मा पतिचाही पती आहे. त्या एक शिव परमात्म्याचीच पावनकारी स्मृती बुद्धीत धारण कारणे, त्यावरच मन एकाग्र करणे, त्याच्याशीच अनन्य प्रीती जोडणे म्हणचेच 'योग' होय. या योगाद्वारेच स्त्री 'शिवशक्ती' बनते, अबलेची सबला होते. त्याच लक्ष्याद्वारे ती नारीची श्रीलक्ष्मी बनते. त्या ज्ञानेश्वराच्या ज्ञानाद्वारेच ती विद्या-दायिनी सरस्वती बनते. हे माते, आता तू शिव परमात्म्याशी मनाने प्रेम कर, त्याच्यावरच बुद्धी एकाग्र कर, अर्थात बुद्धीत फक्त

त्याचीच स्मृती ठेव, 'शिवशक्ती' हो अशा रीतीने आपले व जगाचे कल्याण करण्यास निमित्त हो.

आज बहुतेक सर्वांचे तन-मन विषय-विकारांच्या सूक्ष्माग्नीच्या सूक्ष्म तापाने जळत आहे. याची परिणती अर्थातच सर्वत्र अशांती निर्माण होण्यात झालेली आहे. विकारांचा हा अग्नी विझवून आत्म्याला शांत केल्यासच सर्वजण शीतल होणे शक्य आहे आणि तेव्हाच स्त्री शीतला होऊ शकेल. आज माणसाच्या असंख्य कामना आहेत, ज्यांची पूर्ती युगे न युगे त्याला सर्व प्रकारचे धन, पदार्थ, मानसन्मान, संपदा इत्यादी मिळूनही होणे शक्य नाही. केवळ ईश्वरप्राप्ती अथवा सहज राजयोगाद्वारे पवित्रता आणि आनंदाची प्राप्तीच अशी प्राप्ती आहे ज्यायोगे आत्मा संतुष्ट होऊ शकतो. तेव्हाच मग स्त्रीरूप आत्मा संतोषी होऊ शकेल. पण विकारांचा अग्नी विझविणे, मन शीतल करणे तसेच जीवात्म्याला (देहधारीआत्मा) आनंदमय करून तृप्त व संतुष्ट करणे हे सर्व ईश्वरी ज्ञान आणि सहज राजयोगाद्वारेच होऊ शकते. म्हणून तू आता ते ज्ञान धारण कर आणि त्या योगाचा अभ्यास करून शीतला माता, संतोषी माता हो. हे नारी, अशा रीतीने तू कल्याणी हो.

मातेची ममता, मुलांविषयीची संवेदनशीलता आणि करुणा जगप्रसिद्ध आहे. स्त्रीत त्याग, सेवा-भाव, सहनशीलता आणि समायोजनाच्या क्षमता इत्यादी गुण विशेष असतात हे सर्वजण मान्य करतात. हे माते, आता तू या विशेष गुणांचा विकास करून ते दिव्य व अलौकिक कर, त्यांचा उपयोग केवळ आपल्या काही दैहिक सग्या-

सोयऱ्यांकरिता करण्याऐवजी समस्त मानवमात्रांसाठी कर. आता आपला सेवा-भाव या विश्वरुपी कुटुंबाच्या आध्यात्मिक सेवेसाठी कामी आण अर्थात प्रत्येक व्यक्तीत ज्ञान व सद्गुण भरण्याच्या अति शुभ कार्यासाठी सार्थकी लाव. आता आपली त्यागाची क्षमता मनोविकार तसेच देहाभिमान यांचा त्याग करण्यात किंवा उपाधी व प्रसिद्धी यांच्या प्राप्तीच्या कामनेचा त्याग करण्यात वापर आपली संवेदनशीलता व करुणा जगातील दुःखी आत्म्यांना अज्ञानाच्या शापातून मुक्त करण्यासाठी आणि मनोविकारांच्या दलदलीतून बाहेर काढण्यासाठी उपयोगात आण. तू ममताशील आहेस, आपली ममता साऱ्या जगाला दाखवून दे. हे माते, तुझ्यात जी समायोजनाची क्षमता आहे तिच्या सहाय्याने माणसात स्थायी रुपात सहजीवनाची योग्यता निर्माण करण्याचा प्रयत्न कर. आपल्या ह्या स्वभावजन्य विशेष गुणांचा विकास तसेच दिव्यीकरण करीत तू महादानी हो. माते आता तू कल्याणी हो.

भारतीय स्त्रीत असलेला समर्पण भाव तसेच तिचे पतिव्रता होण्याचे वैशिष्टय सर्वांना ज्ञात आहे. तिचा समर्पण भाव व त्याग यांच्यापुढे सर्वच विनम्र होतात. तिच्या अतुलनीय सहनशक्तीमुळे परिवार दुभंगत नाहीत आणि कुटुंबातले सदस्य एकजुटीने राहतात. वाङ्निश्चयाच्या वेळेपासूनच तिचा समर्पण भाव प्रकर्षीत होऊन पूर्ण 'शरणागती'चे रूप घेतो. आणि तेव्हा तिचा पतिव्रता धर्म तिचे अमूल्य चारित्रिक भांडवल होऊन बसतो. स्त्रीच्या ह्या गुणांचे गायन सारे जग

करते. यांचाच आधार घेऊन इतिहासात स्त्रियांचा उल्लेख केलेला आहे. म्हणून हे माते, आता तू पतींचाही पती अशा परमात्म्याला आपले मन समर्पित करून खऱ्या अर्थाने पतिव्रता स्त्री हो. आता तू जगात नैतिक नियम तसेच मानवी मूल्ये यांची पुनर्स्थापना करण्याच्या ईश्वरी सर्वश्रेष्ठ कार्यास हातभार लावीत आसुरी वृत्तीच्या लोकांची कटू टीका, त्यांचे उपरोधिक बोलणे आणि ते करीत असलेले अत्याचार वगैरे सर्व काही सहन कर, त्यांना समर्थपणे तोंड दे आणि ही अग्नी परीक्षा पार करीत खरी सीता, सावित्री हो. ऊठ, आता तू आपला स्वमान जाणून घे आणि आपले कर्तव्य ओळख. आत्म्यांचा स्वामी अशा परमात्म्यापासून मनाचे नाते तोडल्यामुळेच आत्म्याचे घोर अध:पतन झालेले आहे. परमात्म्यारूप पतीशी एकव्रत राहिल्याने प्रत्येकाची बुद्धी व्यभिचारी अर्थात अवस्था विकारी झालेली आहे. तेव्हा हे नारी, तू परमेश्वररुपी पतीवर प्रेम करून पावन हो, जग-कल्याणी हो.

'पती हाच पत्नीचा गुरु आहे' तसेच 'पती हाच पत्नीचा परमेश्वर आहे' असे पूर्वापार लोक सांगत आलेले आहेत. पण परमेश्वर तर परम पवित्र आहे आणि पतित-पावन आहे. तेव्हा जो पती स्वत: पतित असेल आणि पत्नीलाही पतित करीत असेल, तिच्यावर कामविकाराचा कुठाराघात करीत असेल तर तो काय स्वत:ला परमेश्वर म्हणवू शकेल ? नि:संशय, श्रीनारायण व श्रीराम जसे पती तर पती-देव होत पण कामातुर, मनोविकारांचा दास, दारुच्या नशेत शुद्ध-बुद्ध गमावून बसलेला, स्त्रीवर अत्याचार व बलात्कार करणाऱ्या पतीलाही काय गुरू

वा परमेश्वर म्हणता येईल ? गुरू हा तर गती व सद्गती देण्यास तसेच आध्यात्मिक ज्ञान देऊन पवित्रतेच्या मार्गाने घेऊन जाण्यास निमित्त होत असतो आणि परमेश्वराची तर सर्वजण प्रार्थना करतात की, "हे देवा! विषय-विकार नष्ट कर व पापमुक्त कर." तेव्हा वास्तविक सत्य तर हेच आहे की, परमेश्वरच सर्व आत्म्यांचा पती, सर्व सीतांचा राम आहे. तोच सर्वांचा सद्गुरु आहे जो सर्व आत्म्यांना अंधारातून प्रकाशाकडे, असत्यापासून सत्याकडे व सात्विकतेकडे तसेच मृत्यूपासून अमरत्वाकडे घेऊन जातो. पतिव्रता स्त्रीचा एक परमेश्वरच गुरुंचाही गुरू असणारा खरा सद्गुरु होय. म्हणून हे माते, त्याने दाखविलेल्या सन्मार्गाने जाण्यानेच तुझे कल्याण होईल. त्याच्याद्वारे आपले कल्याण करीत तू कल्याणी हो.

जगात ज्या नररूप देहधाऱ्याशी पतीचे नाते आणि इतर काही देहधाऱ्यांशी मातेचे नाते जोडलेले असेल त्यांची तू सेवा कर, त्यांना प्रेम दे पण त्याचबरोबर त्यांच्याकडेही आत्मिक दृष्टीने पाहून त्यांचे कल्याण करण्यास निमित्त हो. एका परमात्म्याच्याच स्मृतीत एकाग्र होऊन भोजन 'प्रसादाप्रमाणे' पवित्र करीत त्यांची मनेही पवित्र करण्यास निमित्त बन. घरात श्रीलक्ष्मी, श्री नारायण, श्री सीता, श्रीराम, श्रीसरस्वती इत्यादींची चित्रे लाव, घरात शालीनता, सच्चारित्र्य आणि पवित्रतेचे वातावरण निर्माण करून घराला खऱ्या अर्थाने 'गृहस्थाश्रम' बनव. सर्वांना तू ईश्वरावर प्रेम करण्यास शिकव. हे माते आता तूच गुरुचे कर्तव्य पार पाड. जी माता मुलांसाठी ज्ञानाचे अंगाई गीत गाते

तीच 'सुमाता' होय. जी पत्नी पतीला धर्मभ्रष्ट होऊ देत नाही तीच खरी 'धर्म-पत्नी' होय. जी संसाराला गृहस्थाश्रम मानून आदर्श जीवन व्यतीत करते तीच आदर्श स्त्री होय. आता तू आदर्श स्त्री होऊन सत्यवानाची सावित्री हो. तू खरी मिरा हो.

जेथे स्त्रियांची पूजा होते तेथे देवता भ्रमण करतात असे म्हटले जाते. सत्ययुगात हाच आपला भारत देवी-देवतांचा देश होता. त्या काळी स्त्रियांना फार सन्मान दिला जात असे. आजही श्रीनारायणापूर्वी 'श्री लक्ष्मी' आणि श्रीरामापूर्वी 'श्री सीता' अशी नावे घेतली जातात. पण तेव्हा स्त्रियाही दिव्यगुणसंपन्न अर्थात देवी होत्या. म्हणून आता तू पुन्हा दिव्यगुसंपन्न हो इतरांनाही दिव्यगुण धारण करविण्यास निमित्त बन तरच हा भारत पुन्हा देवी-देवतांचा देश होईल आणि येथे सत्ययुग अवतरेल. तेव्हा पुन्हा येथे स्त्रियांना सन्मान दिला जाईल आणि प्रत्येक पुरुषही महान होईल. म्हणून ऊठ, आता तू महान हो, स्वमानामध्ये दृढ राहून सत्ययुगाकडे वाटचाल कर.

हे माते , तू बलिदानी आहेस. दुसऱ्यांचे दुःख तुला बघवत नाही. आपल्या सर्व मुलांच्या सुख-सोयीसाठी आपल्या सर्वस्वाचे बलिदान करण्यास तू प्रवृत्त होतेस. म्हणून आता तू ह्या मनोविकारांचे बलिदान शिवपरमात्म्याला दे. तेव्हा मग प्रत्येकजण तुलाही आपल्या ह्या कलुषित वृत्तींचे बलिदान देईल. आजही भक्तगण देवींना बलिदान देतात पण ते आपल्या अहंकाराचा बळी देण्याऐवजी बिचाऱ्या बकऱ्याला बळी देतात, कारण तू देवी वास्तविक देहाभिमानाचा बळी पसंत करतेस

हे काही ते जाणत नाहीत. म्हणून तू प्रथम मनाने मी पणाचा बळी शिव परमात्म्याला दे तरच तू भक्तांच्या अहंभावाचा बळी स्वीकारून त्यांना वरदान देऊ शकशील.

सांप्रत भक्तगण पावन होण्यासाठी गंगा-स्नान करण्यास जातात. पण पावन होण्याची त्यांची ती भावना काही पूर्ण होऊ शकत नाही कारण पतित-पावनी तर ती ज्ञान-गंगा आहे जी शिव परमात्म्यापासून उगम पावून व मातेचे रूप घेऊन ईश्वरी ज्ञान प्रवाहित करीत राहिली होती. तिच्याच स्मृत्यर्थ आज लोक गंगेला 'गंगा माता' म्हणतात. आणि तिची मूर्तीही तयार करतात. आता तू परमपिता शिव परमात्म्याचे पावनकारी ज्ञान प्राप्त करून गंगा रूप हो, तू पतित-पावनी हो.

जी पतितांना पावन करणारी असेल, तिच्यापाशी अपवित्रता कशी येऊ शकेल ? तिच्या जवळपास निकृष्ट व तामसिक भोजन, दुसऱ्यांना पिळून कमाविलेला पैसा, आसुरी किंवा म्लेंच्छांकडून वापरले जाणारे व्यसनांचे पदार्थ कसे येऊ शकतील ? म्हणून हे पतित-पावनी माते, आता तू घराघराचा उद्धार कर. घर न घर पावन बनव. तू प्रत्येक घरातील मास, मदिरा, बिडी-सिगारेट, भ्रष्टाचाराने कमाविलेला पैसा इत्यादी वर्जित कर. या सृष्टीरुपी विशाल घरात ही तुझी जी मुले आहेत त्यांना व्यसनाच्या गर्तेतून बाहेर काढ. हे ज्याला पाणी समजून वाळवंटात पळत आहेत त्या मृगतृष्णेच्या मायाजालातून त्यांना बाहेर काढ. ज्या व्यसनांच्या शृंखलांत हे शतकानुशतके जखडले गेले आहेत त्या शृंखला तोडून त्यांना तू त्यांतून मुक्त होण्यास मदत कर. हे ज्या

मनोविकारांच्या अग्नीत जळत आहेत त्या अग्नीत भस्मीभूत होण्यापासून त्यांना वाचव. त्यासाठी तू त्यांचे अन्न, धन व मन पवित्र कर. हे माते, आता तू प्रत्येकासाठी वरदानी हो, कल्याणी हो.

पहा तर खरे, आज तुझी स्त्री जाती कसा श्रृंगार करीत आहे ते! आजच्या स्त्रिया उत्तान व भडक श्रृंगार करून पुरुषांत कशा कलुषित विचार चेतविण्यास आणि त्यांना अपवित्रतेच्या दलदलीत रुतविण्यास निमित्त बनत आहेत. म्हणून तू आता जागी हो, शक्ती रूपा हो. तुझा श्रृंगार तर तुझे सद्‌गुण होत. तुझे सौंदर्य तर शुद्ध चारित्र्य व चेहऱ्यावरील हर्षाची लालिमा होय. दिव्यगुणाची तर तुझ्यात सुगंधी आहे. याच श्रृंगाराने जग आकर्षित व हर्षित होत असते. आणि यानेच सर्वांचा उत्कर्ष होतो. म्हणून तू साधेपणा, सरळपणा, स्वच्छता, प्रेम आणि संतोष यांचाच शोभनीय व अति सुंदर श्रृंगार कर.

आज नवऱ्या मुलींकडून किती लोक हुंड्याची मागणी करून त्यांना सतावीत आहेत. त्यांचे मूल्यांकन हुंड्याच्या आकड्यावरून किती तरी लोक निर्लज्जपणे करीत आहेत. आणि हुंडा न मिळाल्यास सुनेला जाळण्यासही मागेपुढे पाहत नाहीत. स्त्रियांमध्ये एकी व जागृती होत नसल्याचे पाहूनच हे लोक बेपर्वाईने व्यवहार व अत्याचार करण्यास धजावत आहेत. अशा स्त्रियांचा आक्रोश तुला ऐकू नाही का येत ? हे माते, आता तू जागी हो, या अनिष्ठ प्रथेंचा नायनाट कर. आता तू स्वमान ओळख आणि माणसाला माणुसकीचे धडे दे. आता हे जग शिवालय बनव, देवालय बनव आणि हे दु:खालाप समाप्त करून शिव परमात्म्याला भेट.

पण जगाचे कल्याण होईल कसे ? मनोविकारांचा अग्नी विझेल कसा ? स्त्री-पुरुष देवी-देवता कसे बनतील ? या जगात पवित्रता, सुख व शांती पुन्हा कशी येईल ? यासाठी ईश्वरी ज्ञान, सहज राजयोग आणि दिव्यगुणरूपी ही जी तीन अमूल्य रत्ने अथवा तीन वरदाने आहेत त्यांची प्राप्ती करावयास हवी. म्हणून हे माते, आता तू ही वरदाने प्राप्त करून वरदानी हो, आता तू कल्याणी हो.

---


: प्रकाशक :

मराठी साहित्य विभाग

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालय

इंद्रप्रस्थ भवन, 8-अ, वसंत नगर, नागपूर-440 022

☎9373225747, 2246793, 2225746

ईमेल : vasantnagar.ngp@bkivv.org

# प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाद्वारे
# मराठी भाषेत प्रकाशित झालेली पुस्तके

| | |
|---|---|
| मनोबल व मानस सेवा | स्वास्थ्य प्रदर्शन |
| सहज राजयोग विधी आणि सिद्धी | सात्विक आणि योगयुक्त जीवन |
| अद्‌भुत चरित्र-1 | ईश्वरी मत आणि मनुष्य मत |
| अद्‌भुत चरित्र-2 | चांगली मुले |
| ज्ञान योग पवित्रता शांती पथ-प्रदर्शन | बाल नैतिक शिक्षण |
| साप्ताहिक पाठ्यक्रम | बापदादांचे महावाक्यांचे सार |
| दिव्य गुणांचा पुष्पगुच्छ | परमात्म्याचे अवतरण |
| नैतिक शिक्षा चरित्र निर्माण | धर्म कर्म विज्ञान |
| विज्ञान आध्यात्म व पर्यावरण | मृत्युपूर्वी व मृत्युनंतर काय? |
| कमल सम पवित्र जीवन | ज्ञानाचे अनमोल मोती |
| शिव आणि शिवरात्रि | विश्व विद्यालयाचा संक्षीप्त परिचय |
| श्रीमद् भगवद्‌गीतेचे सत्य सार | कर्माची गहन गती |
| असे होते ब्रह्माबाबा | राजयोग प्रवचन माला |
| प्रेरणादायक गोष्टी | प्रापंचिक जीवनात सहजयोग |
| मुलांचे बाबा | आत्मा व परमात्म्याचा परिचय |

राजयोग, कर्मयोग, निर्विकल्प
समाधी
संस्कार परिवर्तन व व्यवहार शुद्धि
आत्म्याच्या तीन काळांची कहाणी
जीवनांत खरे सुख व खरी शांती
कशी मिळेल
आजचा सुविचार
तनावमुक्त जीवन
निरोगी जीवनाचे दहा सोनेरी नियम
परमात्म्याचा परिचय
मनाची शांती
विकारांवर विजय कसा मिळवावा
सत्य नारायणाची सत्य कथा

गीता ज्ञान दाता कोण?
योगी-जीवन
जीवन हिरेतुल्य कसे होईल
युवका जाग आणि जागव
विद्यार्थ्यांशी हितगुज
नारी तू कल्याणी हो!
पैसा मिळवा पण कसा?
अमली पदार्थ व्यसनाधिनता
शिव संदेश
शिक्षणाची नवी दिशा
ओम शांती
ईश्वरी ज्ञान व राजयोगाचा पत्र-
पाठ्यक्रम (सात पाठ)

# प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय

## पांडव भवन, आबू पर्वत, राजस्थान

संपूर्ण विश्वात एकूण 8500 सेवाकेंद्रे आहेत

## महाराष्ट्रातील सेवाकेंद्रे

**मुंबई**-22 : 19,नरोत्तम निवास, किंग सर्कल स्टेशन जवळ सायन..... फोन: 24073015

**मुंबई**-56 : 'ओमशांति', स्वस्तिक सोसायटी, प्लाट नं 48,
एन.एस.3 रस्ता, जुहू योजना, विलेपार्ले...... फोन: 26160789

**मुंबई**-7 : 23, दर-उल-मुलूक, पं.रमाबाई रोड, गांवदेवी..... फोन: 23636585

**मुंबई**-5 : 24-25, 'गीतांजली', रेडिओ क्लबमागे, कुलाबा.......... फोन: 22830494

**मुंबई**-62 : 'आश्रय', 4 रस्ता, एम. जी. रोड,
तिवारी हॉस्पीटलजवळ, गोरेगांव (पश्चिम)............... फोन: 28741882

**मुंबई**-55 : 102, एवरेस्ट, पहिला मजला, नेहरू रोड,
पोस्ट ऑफिसजवळ, शांताक्रुज (पूर्व).................... फोन: 26103731

**मुंबई**-77 : 23-24, शंकरछाया, 19 म. गांधी रोड, घाटकोपर (पूर्व) फोन: 25093700

**मुंबई**-80 : गालामानोर, प्लाट नं. 544 बी,
ब्लाक नं. 3,4,5 एन. एस. रोड, मुलुंड (पश्चिम)......... फोन: 25617393

**मुंबई**-92 :बी/6 गार्डन व्ह्यू अपार्टमेंट, चंदावरकर लेन, बोरीवली(प.) फोन: 28903896

**नागपूर**-22: **(मराठी साहित्य व पत्र-पाठ्यक्रम)**. 'इंद्रप्रस्थ', 8-अ, वसंत नगर
फोन: 2246793, 2225746, 2245178

**पुणे**-37 : 19/377, मिरा सोसायटी, शंकर शेट रोड............... फोन: 26450767

**पुणे**-2 :111,कावेरी अपार्टमेंट, आंबेडकर कॉलेज जवळ,क्वाटर गेट फोन: 26353327

**पुणे**-1 : अे-12, 'शांतीकुंज' जी.पी.ओ. समोर....................... फोन: 26122525

**नासिक**-3 : 4612, ओल्ड आग्रा रोड, भागवत निवास,
पंचवटी सेवाकुंज समोर................................ फोन: 2518484

**अमरावती**-6 : 'सुखशांती भवन', विजय कॉलनी.....................फोन: 2574397

**अकोला**-1 : टी/3 किर्तीनगर, गोरक्षण रोड, (.ऊ.६.) जवळ...... फोन: 2458547

**औरंगाबाद**-5 : सुख शांती भवन, 30/35 भानुदास नगर ............ फोन: 2342199

**चंद्रपूर**-2 : 'तपस्या भवन', भानापेठ, वार्ड नं. 2, कस्तुरबा रोड....... फोन: 253574

**कोल्हापूर**-2 : 2397, शिवाजी पेठ, तटाकडील तालीम गल्ली....... फोन: 2629421

**सोलापूर**-2 : 'शिवप्रकाश भवन', 15/18 अ, कारंबा रोड, सम्राट चौ. फोन: 2325671

**जळगांव**-1 : 'ओमशांती भवन', ढाके कॉलनी, ब्रह्माकुमारीज मार्ग.... फोन: 2236259

**भुसावळ**-1 : 'राजयोग भवन', यावल रोड.......................... फोन: 222949

**भंडारा**-4 : 'शिव स्मृती भवन', कृष्ण मंदिर वार्ड..................... फोन: 252168

**वर्धा**-1 : गोपूरी, साठवणे ले-आऊट, पवनार नाका.................. फोन: 242323

**यवतमाळ**-1 : 'सुख शांती धाम', 74, ओम सोसायटी, अमी रोड.... फोन: 246615

**बुलढाणा**-1 : एकता नगर, पोस्ट क्वार्टर्सच्या मागे, सर्क्युलर रोड...... फोन: 242724

**लातूर**-31 : 'राजयोग भवन', ओल्ड औसा रोड, नंदी स्टॉप...........फोन: 200097

**मलकापूर**-1 : जिल्हा बुलढाणा, 40 बीघा, बंदे फ्लोर मिल जवळ..... फोन: 260386

**नांदेड**-5 : 'सुख शांती भवन', कैलाश नगर.......................... फोन: 251649

**सांगली**-16 : ब्लॉक नं. 4, प्लाट नं. 5, साखर कारखाना............ फोन: 2310342

**वीड**-22 : 'दिव्य दर्शन भवन', आदर्श नगर, पांगरी रोड............. फोन: 222915

**गोंदिया**-1 : 'स्वदर्शन भवन', न्यू लक्ष्मी नगर.......................... फोन: 250264

**सातारा**-1 : कल्याणी नगर, झेड.पी.कँपच्या समोर .................... फोन: 229795

**मालेगांव**-3 : (जि. नाशिक) 'लाईट हाऊस', 310, संगमेश..........फोन: 250495

**पणजी** (गोवा)-1 : ई-98 माळा......................................फोन: 2226044

**पणवेल**-6 : (जि. कुलाबा) आदिती, प्लॉट नं.107,
रूम नं. 102,103, मीडल क्लास सोसायटी....... फोन: 27452618

**कल्याण**-1 : (जि. ठाणा) 'स्मृती बिल्डिंग', फर्स्ट फ्लोअर,
अहिल्याबाई चौक........................................ फोन: 2209959

**हिंगणघाट**-1 : (जि. वर्धा) 'ज्ञान विज्ञान भवन', 148, यशवंत नगर... फोन: 245028

**गडचिरोली**-5 : 'शिवशक्ति भवन', शिवाजी वाचनालयाजवळ .......फोन: 232442
**देगलूर**-17 : (जि. नांदेड) 'अमृतकुंड', दत्त कृपा सोसायटी-2.........फोन: 255607
**उदगीर**-17 :(जि.उस्मानाबाद) 'सद् भावना भवन', 3-2-1014/1,
ओमशांती कॉलनी.......................... ........ फोन: 256340
**उमरेड**-3 : (जि. नागपूर) 'पावन धाम', कावरा पेठ................... फोन: 242787
**वरूड**-6 : (जि. अमरावती) 'ज्ञानदीप भवन', गोमापूरवार्ड............फोन: 234073
**पुसद**-4 : (जि. यवतमाळ) 'आत्मदर्शन भवन', विठाबाई नगर........ फोन: 248333
**परतवाडा**-5 : (जि. अमरावती) 'शिवदर्शन भवन', मोहन नगर........ फोन: 221353

**भारतातील अन्य सेवा केंद्रे**

**दिल्ली**-5 : पांडव भवन, 25 न्यू रोहतक रोड, करोल बाग............फोन: 23628976
**कोलकाटा**-20 : 1/अ, आशुतोष मुखर्जी रोड........................ फोन: 24753521
**अहमदाबाद**-22 : 'सुखशांती भवन', भुलाभाई पार्क रोड, कांकरिया..फोन: 25324360
**चेन्नई**-40 : 'शांतिधाम', प्लॉट नं. 3702-96, 3रा एव्हेन्यू अन्नानगर.फोन: 26267441
**चंदीगड**-20 : 'राजयोग भवन', सेक्टर 33 अे.................... फोन: 2601339

## OVERSEAS

**LONDON**-NW 10-2 HH : Global Co-operation House, 65 Pound Lane, Ph : 44-20-8727 3350
**NEW YORK**, 10017:Brahmakumari's Office at U.N.Room No. 436, 866 UN Plaza (Ph :1-212-688 1335)
**NAIROBI**- (Kenya) Global Museum, Maua close, Westlands, PO Box 123-00606-Ph-254-20-3743572, 3741239
**SYDNEY** NSW 2131- 'Indraprasth' 78 Alt Street Ashfield ....Ph : 61-2-9799 9880
**PARIS**-75020, 74 Rue Orfila, Ph : 33-1-4358 4427
**BERLIN** Crellestr,-26...Ph-49-30-7813059
**GENEVA** (Switzerland) : 12 rue. de cour 86, Ph 41-21-7223610